MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १७ अंक : ६ पाने-८ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

भारताचे ऊर्जा क्षेत्र हे झपाट्याने वाढत आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे भारतातील ऊर्जासंबंधी पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली आहे. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामगिरीमुळे महापारेषण ही देशातील सर्वात मोठी पारेषण कंपनी म्हणून नावारूपाला आहे.

महाराष्ट्रातील बहुतेक पारेषण प्रणाली महापारेषण कंपनीच्या मालकीची असून आजमितीला ५०४७० सर्किट कि.मी. पारेषण वाहिन्या आणि १३५१३४ एम.व्ही.ए. पारेषण क्षमतेसह ७१९ अति उच्च दाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्रांचे संचलन महापारेषण करते. महाराष्ट्रातील ऊर्जा पारेषणचे जाळे मजबूत झाले आहे. महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरल्यामुळे पारेषण प्रणालीची विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेत सुधारणा करण्यास मदत झाली आहे. आजच्या घडीला

- **आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारा**
- **सांघिक भावनेने काम करा**
- **अधिकारी-कर्मचारी संवाद वाढवा**
- **कामात वेळोवेळी सुधारणा करा**

महापारेषण ही देशातील सर्वात मोठी राज्य 'ट्रान्समिशन युटिलिटी' आहे.

महापारेषणमध्ये आपण पारेषण पायाभूत सुविधांची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञान स्वीकारले आहे. पारेषणबाबतच्या पायाभूत सुविधांमध्ये एच.व्ही.डी.सी. आणि मोनोपोलचा समावेश केल्यामुळे आपली पारेषण कार्यक्षमता वाढविण्यात खूप मदत झाली आहे. ड्रोन, हॉटलाईन देखभाल आणि `एमटीएएमसी` केंद्रांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पारेषण वाहिन्या, मनोरे आणि उप-केंद्रांच्या देखभाल आणि व्यवस्थापनात लक्षणीय परिवर्तन झाले आहे.

एच.व्ही.डी.सी. तंत्रज्ञानामुळे लांब अंतरावर कमीत कमी गळती साधून विजेचे वहन करणे शक्य होते. तसेच पारेषण आणि ऊर्जा वहनाचे चांगले नियंत्रण करता येते. एच.व्ही.डी.सी. तंत्रज्ञानाचा उपयोग करून राज्याच्या एका भागात निर्मित केली जाणारी वीज कोणत्याही मोठ्या वीज हानीशिवाय दुसऱ्या भागात कार्यक्षमतेने पारेषित केली जाते.

पारेषण पायाभूत सुविधांमध्ये मोनोपोल मनोऱ्यांचा समावेश एक वरदानच म्हणावे लागेल. मोनोपोल हा पारेषण मनोऱ्याचा एक प्रकार आहे जे पारंपरिक मनोऱ्यापेक्षा अधिक लाभकारी ठरते. देशाची वाढती लोकसंख्या आणि जागेचा अभाव लक्षात घेता विशेषत: जास्त लोकसंख्या असलेल्या भागात मोनोपोल मनोरे एक चांगला पर्याय ठरतात. त्याचप्रमाणे पारंपरिक मनोऱ्याच्या तुलनेत मोनोपोल मनोरे उभारणे आणि त्यांची देखरेख करणे सोपे जाते. महापारेषणने काही पारेषण वाहिन्यांमध्ये मोनोपोलचा उपयोग करण्याची सुरुवात केली आहे आणि भविष्यात ते वाढवण्याचाही मानस आहे.

देखरेखीच्या दृष्टिकोनातून ड्रोन हे पारेषण वाहिन्या आणि मनोऱ्यांचे निरीक्षण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण असे उपकरण बनले आहे. हाय-रिझोल्यूशन कॅमेऱ्यांचा उपयोग करून ड्रोनच्या सहाय्याने पारेषण पायाभूत सुविधांची तपशीलवार छायाचित्रे काढू शकतात, ज्यामुळे आपली टीम संभाव्य समस्या ओळखू शकते आणि आवश्यक दुरुस्ती किंवा देखभाल करण्यास मदत होते. यामुळे संभाव्य समस्या ओळखण्यात आणि वेळेवर त्यात सुधारणा करण्यास खूप मदत होते.

महापारेषणने २४ 'रिमोट एअरबोर्न इन्स्पेक्शन आणि स्कॅनिंग' सिस्टम्स (रिमोटव्दारा नियंत्रित ड्रोन) खरेदी केले असून ई.एच.व्ही. वाहिनीची जवळून तपासणी करण्यासाठी कंडक्टर/इन्सुलेटर्स, गहाळ झालेले व खराब झालेले हार्डवेअर, कंडक्टर किंवा हॉटस्पॉट इत्यादींचे निरीक्षण करण्यासाठी कोणत्याही संभाव्य उणिवा व दोष आणि आरओडब्लूसह अन्य उल्लंघन व अतिक्रमण समस्यांचे नेमके निरीक्षण करण्यासाठी `जीपीएस`सह 'थर्मो व्हिजन' आणि अति संवेदनशील व्हिज्युअल कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत.

ड्रोनशिवाय पारेषण वाहिन्या आणि मनोरे यांच्यावर नजर ठेवण्यासाठी हॉटलाईन देखभाल हे एक आवश्यक तंत्रज्ञान बनले आहे. या पध्दतीमध्ये पारेषण वाहिन्या सक्रिय असताना देखभाल करणे, 'आउटेज' ची गरज आणि ग्रिडमधील व्यत्यय कमी करणे या गोष्टी समाविष्ट आहेत. देखभाल करणारे आपले अधिकारी व कर्मचारी योग्य सुरक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासह लाइव्ह पारेषण वाहिन्या आणि मनोरे यांच्यावर सुरक्षितपणे काम करू शकतात तसेच कामासाठी लागणारा वेळ कमी करू शकतात आणि विजेचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करण्यात यशस्वी होतात.

या नंतर आपण २३ मीटर उंचीवर हॉटलाईन दुरुस्ती व देखभालीची कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी नागपूर आणि पुणे या दोन परिमंडळांसाठी "इन्सुलेटेड टाईप एरियल वर्क प्लॅटफॉर्म" (आर्टिक्युलेटिंग बूम लिफ्ट) खरेदी केले. ही यंत्रे पर्यवेक्षणाचे काम चालू असताना त्या ठिकाणाभोवती स्वत:ला चालवण्यास सक्षम असल्यामुळे ट्रिपिंग कमी करण्यासाठी या हॉटलाईन युनिट्स नियमितपणे हॉट लाईन 'वॉशिंग' ची क्रिया करित राहतात. महापारेषणने कराड आणि नाशिक अशा दोन परिमंडळाकरिता दोन हॉटलाईन वॉशिंग उपकरणे खरेदी केली असून आणखी पाच खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

देखभाल व दुरुस्तीसाठी ड्रोनचा आणि हॉटलाईन उपकरणांचा उपयोग करण्याचे अनेक फायदे आहेत. यात अधिक सुरक्षा, वाढीव कार्यक्षमता, उपलब्धता, शटडाउनमध्ये कपात आणि ट्रिपिंग यांचा समावेश आहे. ड्रोनच्या सहाय्याने आपण संभाव्य समस्या तत्काळ ओळखू शकतो आणि दुरुस्तीला प्राधान्य देऊ शकतो. यामुळे दुरुस्ती लवकर होते आणि 'डाउनटाइम' ही कमी होतो. हॉटलाईन देखभाल केल्याने आउटेज कमी करण्यात मदत होते आणि देखभाल कामासाठी पारेषण वाहिन्या बंद करण्याशी संबंधित खर्च कमी होतो.

ड्रोन आणि हॉटलाईन देखभाल उपकरणांच्या वापरामुळे पारेषण वाहिन्या आणि मनोऱ्यांच्या देखभाल आणि व्यवस्थापनात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. महापारेषणमध्ये पारेषण पायाभूत सुविधांची सुरक्षा, विश्वासार्हता आणि कार्यक्षमता सुधारण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी आपण कटिबध्द आहोत. या तंत्रज्ञानापासून आपण ग्राहकांना अखंड वीजपुरवठा देऊ शकतो.

नुकतीच मी सीआयजीआरई, पॅरिस परिषदेला उपस्थिती लावली आणि तिथे भारतातील ऊर्जा क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्यासाठी ऊर्जा क्षेत्रामधील तंत्रज्ञानातील आघाडीच्या लोकांसोबत चर्चा झाली. यामध्ये ऊर्जा क्षेत्राशी संबंधित विविध बाबींवर आदान-प्रदान झाले.

मला आशा आहे की, अशा प्रकारचा सकारात्मक दृष्टिकोन, प्रगत तंत्रज्ञान आणि नावीन्यामुळे महापारेषणला ऊर्जा पारेषण क्षेत्रात नवीन उंची गाठण्यास निश्चितच मदत होईल. पारेषण क्षेत्राचा उदय आणि त्याची जडणघडण यामुळे भारतातील आधुनिक ऊर्जा क्षेत्रासाठी शाश्वत भविष्य घडविण्यात अमूल्य अशी मदत होईल, यात शंका नाही.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**



▶ वीज प्रकल्पांना गती मिळणार

# वीज मनोऱ्यांच्या जमिनीसाठी शेतकऱ्यांना मिळणार दुप्पट मोबदला

Follow us on :

अति उच्चदाब पारेषण वाहिन्या उभारणीमुळे जमिनीच्या होणाऱ्या नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासाठी राज्य सरकारने सुधारित धोरणाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार अति उच्च दाब मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या मोजणीप्रमाणे आलेल्या क्षेत्रफळाचे जिल्हास्तरीय उपविभागीय स्तरीय मूल्यांकन समितीने निश्चित केलेल्या दराच्या दुप्पट दराने मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी झाल्याने शेतकरी, जमीनधारकांना फायदा होणार असून यामुळे वीज प्रकल्पांना गती मिळणार आहे.

वीज मनोरा आणि वाहिनी उभारण्यासाठी जमिनीचे अधिग्रहण केले जात नाही. केवळ जमिनीचा वापर केला जातो. मनोरा उभारताना जमिनीच्या आणि पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपोटी मोबदला दिला जातो. मात्र हा मोबदला अत्यल्प असल्याने यामध्ये वाढ करण्याची मागणी शेतकरी, लोकप्रतिनिधींकडून होत होती. त्यामुळे पारेषण कंपन्याचे विविध प्रकल्प रखडले आहेत. हे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी महापारेषण कंपनीने नुकसानीपोटी मोबदला देण्याच्या धोरणात सुधारणा करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला होता.

या सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या सुधारित धोरणाप्रमाणे ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अतिउच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठी मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या क्षेत्रफळाचे रेडीरेकनरमधील किंवा मागील तीन वर्षातील झालेल्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या आधारे सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या दुप्पट मोबदला देण्यात येणार आहे. मनोऱ्यातून जाणाऱ्या वाहिन्यांच्या पट्ट्याखालील येणाऱ्या क्षेत्रासाठी अतिरिक्त १५ टक्के तसेच रेडीरेकनर किंवा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या १५ टक्के असा एकूण ३० टक्के मोबदला दिला जाणार आहे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत योग्य मोबदला ठरविण्याचे अधिकार उपविभागीय मूल्यांकन समितीस देण्यात आले आहेत. तर पारेषण वाहिनीच्या विहित मार्गात कोणतेही बांधकाम करण्यास मान्यता राहणार नाही. हे धोरण मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण महाराष्ट्राला लागू करण्यात येणार असून मनोऱ्याने बाधित झालेल्या जमिनीचा मोबदला थेट संबंधित शेतकरी तसेच जमीन मालकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

Like Comment Share MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco



**कराड :** येथे आयोजिलेल्या आंतरपरिमंडळीय नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडळाच्या भू-भू या नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला.



**कराड :** सांघिक कार्यालय, मुंबईच्या 'द आऊट बर्स्ट' या नाटकाने व्दितीय क्रमांक पटकावला.

▶ मंगेश कुलकर्णीला उत्कृष्ट अभिनय आणि हर्षदा वाघमारेला उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार

# महापारेषणच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडळाचे भू-भू नाटक प्रथम

Follow us on :

महापारेषणच्या कराड परिमंडळाने आयोजिलेल्या आंतरपरिमंडळीय नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडळाच्या भू-भू या नाटकाने प्रथम क्रमांक तर व्दितीय क्रमांक सांघिक कार्यालय, मुंबईच्या 'द आऊट बर्स्ट' या नाटकाने पटकावला. वाशी परिमंडळाचे मंगेश कुलकर्णी उत्कृष्ट अभिनेता आणि हर्षदा वाघमारेला उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने गौरविण्यात आले.

कराड (जि.सातारा) येथील यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन (टाऊन हॉल) येथे महापारेषण कंपनीच्या राज्यभरातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत विविध विषयांवर आठ नाटके सादर केली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. श्रीकांत जलतारे, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. सुधीर वानखेडे, अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, कराड परिमंडळाच्या मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार, नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. सतिश अणे, औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा मुख्य समन्वयक श्री. भरत पाटील, नाट्यसचिव श्री. चिदाप्पा कोळी उपस्थित होते.

यावेळी श्री. दिनेश वाघमारे म्हणाले,''स्पर्धेत समाजप्रबोधन, चुकीच्या चालीरिती, पर्यावरण अशा विविध विषयांची मांडणी करणारी नाटके होती. त्यामुळे या सर्वच नाटकातील कलाकारांचे मी अभिनंदन करतो. तसेच ज्यांना पारितोषिक मिळाले, त्यांनी याहीपेक्षा सुंदर काम करण्यासाठी प्रयत्न करावेत तर ज्यांना पारितोषिक मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता पुढील वर्षी जोरात तयारी करून आपली कला सादर करावी. महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी 24x7 काम करतात. कोविड काळात कर्मचाऱ्यांनी अखंड वीजपुरवठा केला. विशेषतः रूग्णालये व अत्यावश्यक सेवेचा वीजपुरवठा कायम सुरळीत ठेवला. तौक्ते व निसर्ग चक्रीवादळातही कर्मचाऱ्यांनी रात्रंदिवस काम केले. महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून ड्रोनचा वापर, मंकी पेट्रोलिंग, उपकेंद्राचा रिमोट कंट्रोलने वापर, ऑप्टीकल वायरचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे महापारेषणला विविध पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे.''

या स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ म्हणून योगिनी कुलकर्णी (स्पर्श), नुरी पाल (भू-भू), चेतन तांबोळी (तीस तेरा), प्रताप भोसले (लाली), सुशील काळे (जननी जन्मभूमी), अरुंधती जगताप (वैशाली कॉटेज), शशिकांत इंगळे (दीपज्योती), सुशील घाडगे (द आऊट बर्स्ट) म्हणून गौरविण्यात आले. बालकलाकार म्हणून रुद्रांक्ष खैरे व भार्गव जोशी, सांघिक कार्यालय, मुंबई व शर्वरी, नागपूर परिमंडळ यांना गौरविण्यात आले.

रंगभूषा/वेषभूषा पुरस्कारासाठी जननी जन्मभूमीने प्रथम तर तीस तेरा नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. संगीत पुरस्कारासाठी 'द आऊट बर्स्ट'ने प्रथम तर भू-भू नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. प्रकाश योजनेसाठी प्रथम पुरस्कारात 'द आऊट बर्स्ट'ने तर व्दितीय स्पर्श नाटकाने बाजी मारली. नेपथ्यसाठी दीपज्योती नाटकाने प्रथम तर स्पर्श नाटकाने व्दितीय क्रमांक मिळविला.

अभिनय (पुरुष) साठी भू-भू नाटकासाठी मंगेश कुलकर्णीने प्रथम तर 'द आऊट बर्स्ट'च्या मधुर बोरकरने व्दितीय क्रमांक पटकाविला. अभिनय (स्त्री) साठी भू-भू नाटकातील हर्षदा वाघमारेने प्रथम तर वैशाली कॉटेज नाटकासाठी स्नेहल दरवडेने व्दितीय क्रमांक पटकाविला. उत्कृष्ट दिग्दर्शकासाठी प्रथम क्रमांक वाशीच्या भू-भू नाटकाने पटकाविला तर सांघिक कार्यालयाच्या द आऊट बर्स्ट नाटकाने व्दितीय क्रमांक पटकाविला. निर्मिती/नाटकासाठी वाशी परिमंडलाच्या भू-भू नाटकाने प्रथम तर सांघिक कार्यालय, मुंबईच्या 'द आऊट बर्स्ट'ने व्दितीय पुरस्कार मिळविला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. मुकुंद पटवर्धन, माधुरी दातार व नरेंद्र आमले यांनी काम पाहिले. यावेळी सांघिक कार्यालय, मुंबईतून महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कराड परिमंडळाच्या मुख्य अभियंता सौ. शिल्पा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता श्री. चिदाप्पा कोळी, अधीक्षक अभियंता श्री. प्रांजल कांबळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अतुल मणूरकर, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. अभिजीत धमाले, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री.राजेश केळवकर व सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) (प्रभारी) श्री. राजू कोळी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील व सदानंद गौड यांनी केले.

थेट-भेट

▶ प्रकाश सरिता प्रशासकीय इमारतीच्या परिसरात वृक्षारोपण

# अमरावती परिमंडळास अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांची भेट

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी नुकतीच अमरावती परिमंडळाला भेट दिली. अमरावती परिमंडळाच्या या भेटीत परिमंडळांतर्गत सर्व प्रकल्पांची व संचलन कामांचा आढावा घेतला.

या बैठकीसाठी संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनिल सूर्यवंशी उपस्थित होते. सदर आढावा बैठकीत कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला व कामांची प्रगती समाधानकारक असल्यामुळे सर्वांचे अभिनंदन केले. तसेच परिमंडळाच्या प्रशासकीय इमारत प्रकाश सरिता येथे १०० के. व्ही. ग्रिड कनेक्टेड सोलर प्रोजेक्टचे कौतुक केले व अशा प्रकारचे प्रकल्प उपकेंद्रामध्ये उभारणे व शक्य असल्यास त्याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आदेश दिले. या आढावा बैठकीनंतर मान्यवरांच्या हस्ते प्रकाश सरिता प्रशासकीय इमारतीच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



अमरावती : प्रकाश सरिता या प्रशासकीय इमारतीच्या परिसरात वृक्षारोपण करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. शेजारी संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनिल सूर्यवंशी, मुख्य अभियंता श्री. जयंत विके व अन्य अधिकारी वर्ग.

---

शाश्वत ऊर्जा, निरंतर ऊर्जा

▶ प्रकाश सरिता कार्यालयात प्रकल्प कामांची आढावा बैठक

# अमरावतीमध्ये १०० के. व्ही. ग्रिड कनेक्टेड सोलर प्रोजेक्टचे उद्‌घाटन

Follow us on :

अमरावती परिमंडळाच्या प्रशासकीय इमारत प्रकाश सरिता येथे १०० के. व्ही. ग्रिड कनेक्टेड सोलर प्रोजेक्टचे उद्‌घाटन महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी यांच्या हस्ते करण्यात आले.

या १०० के. व्ही. ग्रिड कनेक्टेड सौरऊर्जा प्रकल्पामुळे वीजबिलामध्ये मोठया प्रमाणात घट पाहण्यास मिळत आहे. याप्रसंगी सांघिक कार्यालयाचे मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, अधीक्षक अभियंते श्री. सुनिल शेरेकर, श्री. सुधीर ढवळे, श्री. मुकेश तट्टे श्री. प्रमोद पखाले, श्री सागर जारी यांच्यासह कार्यकारी अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सदर आढावा बैठकीमध्ये विविध कामांचा आढावा घेण्यात आला व उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

सौरऊर्जेपासून प्रदूषणविरहित वीजनिर्मिती करता येऊ शकते. सदर ऊर्जा शाश्वत व निरंतर स्वरुपाची असून ती सर्वत्र उपलब्ध आहे. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले.



अमरावती : येथील परिमंडळाच्या प्रशासकीय इमारत प्रकाश सरिता येथे १०० के. व्ही. ग्रिड कनेक्टेड सोलर प्रोजेक्टचे उद्‌घाटन महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ व अन्य अधिकारी.

**आनंदसोहळा** ▶ औरंगाबाद परिमंडळात महापारेषणचा १७ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

# काम आणि कौटुंबिक जबाबदारी यांचा समतोल राखल्यास आयुष्यात यश : मनीष कलवानिया

Follow us on :

``कुठल्याही क्षेत्रात काम करत असताना `काम आणि कौटुंबिक जबाबदारी` यांचा समतोल राखल्यास तुम्ही आयुष्यामध्ये नक्कीच यशाची उत्तुंग शिखरे गाठू शकता``, असे प्रतिपादन औरंगाबादचे ग्रामीण पोलीस अधीक्षक व राष्ट्रपती पदक विजेते श्री. मनीष कलवानिया यांनी केले.

औरंगाबाद परिमंडळात महापारेषणचा १७ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा थाटात झाला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मनीष कलवानिया बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणच्या औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. रंगनाथ चव्हाण उपस्थित होते. याप्रसंगी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, औरंगाबाद महावितरणचे मुख्य अभियंता श्री. भुजंग खंदारे, औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रोजेक्टचे मुख्य वित्त अधिकारी श्री. उत्तम चव्हाण यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील म्हणाले, ``पारितोषिक योजनेमध्ये सध्या समाविष्ट नसलेले स्थापत्य विभाग व चाचणी विभाग यांचा समावेश करण्याकरिता व्यवस्थापनासमोर बाजू मांडून पुढील योजनेमध्ये समावेश करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.``

यावेळी महावितरणचे मुख्य अभियंता श्री. भुजंग खंदारे व स्मार्ट सिटी प्रोजेक्टचे मुख्य वित्त अधिकारी श्री. उत्तम चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून सर्व विजेत्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. रंगनाथ चव्हाण यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्वप्रथम महापारेषण कंपनीचे कुटुंबप्रमुख या नात्याने श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण तसेच श्री. नसीर कादरी, संचालक (प्रकल्प), श्री. सुगत गमरे, संचालक (मासं), श्री. अशोक फळणीकर, संचालक (वित्त), श्री. रोहिदास मस्के, कार्यकारी संचालक (संचलन) व श्री. सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) या सर्वांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करणारी ही योजना चालू केल्याबद्दल आभार मानले. तसेच पारितोषिक प्राप्त समूहाचे कौतुक करुन गुणगौरव केला व सर्वांनीच असे पारितोषिक मिळविण्यासाठी जोमाने प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करत उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अउदा संवसु मंडळ, परळी कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद बनसोडे यांनी केले. याप्रसंगी पारितोषिक योजना व कंपनीच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल माहिती दिली. तसेच कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. विवेक कानडे यांनी पारितोषिक विजेत्यांच्या निवड प्रक्रियेची सविस्तरपणे माहिती दिली.

पारितोषिक वितरण कार्यक्रमात औरंगाबाद परिमंडळांतर्गत प्रथम व व्दितीय अशा एकूण दहा समूहांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी मनोरंजनाचा एक भाग म्हणून सदाबहार गीतांनी नटलेला संगीतरजनी कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मंजुषा दुसाने व सौ. रोहिणी धनवाहर यांनी केले तर आभार सौ. सीमा गाडेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. बलराज पारिपेल्ली व सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. प्रविण यशवंते यांचेसह आयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



**औरंगाबाद :** परिमंडळात महापारेषणचा १७ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा थाटात झाला. याप्रसंगी औरंगाबादचे ग्रामीण पोलीस अधीक्षक व राष्ट्रपती पदक विजेते प्रमुख पाहुणे श्री. मनीष कलवानिया यांचा सत्कार मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. रंगनाथ चव्हाण यांनी केला. याप्रसंगी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, औरंगाबाद महावितरणचे मुख्य अभियंता श्री. भुजंग खंदारे, औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रोजेक्टचे मुख्य वित्त अधिकारी श्री. उत्तम चव्हाण यांचेसह अन्य मान्यवर.

**माझे संविधान, माझा अभिमान** ▶ संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. सुरूवातीला महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनिल सूर्यवंशी, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनिल सूर्यवंशी, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड व अन्य अधिकारी वर्ग.



**अमरावती :** येथे आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेत महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांचा सत्कार करताना मुख्य अभियंता श्री. जयंत विके. शेजारी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता श्री सुनील शेरेकर व अन्य मान्यवर.

## अमरावती परिमंडळांतर्गत आंतरमंडळीय नाट्यस्पर्धा उत्साहात

# महापारेषण विद्युत कर्मचा-यांच्या कसदार अभिनयाने गाजली नाट्यस्पर्धा

Follow us on :



वीजनिर्मिती केंद्रापासून ते वितरण केंद्रापर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत अविरत, अखंडित व सुरळीतपणे वीज पोहोचवण्याची जबाबदारी आपली महापारेषण कंपनी करीत असते. गेली दोन वर्षे कोरोना महामारीच्या संकटात देखील वीज कर्मचा-यांनी आपले वीजपुरवठा करण्याचे काम अगदी चोखपणे बजावले आहे. अशा अत्यावश्यक सेवेत मोडणा-या क्षेत्रात काम करताना कर्मचा-यांच्या मनावर येणारा ताण कमी व्हावा व त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा या हेतुने या नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

नाट्यस्पर्धेचे उद्घाटन महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, अमरावती विद्यपीठाच्या प्रादेशिक कला विभागाचे समन्वयक श्री. संदीप शेवाळे व श्री. रमेश जाधव यांचेसह श्री. सुनिल शेरेकर, श्री. मुकेश तट्टे, श्री. सुधीर ढवळे, श्री. प्रमोद पखाले, श्री. सागर जारे, श्री. चंद्रशेखर बोराडे व इतरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक अभियंता श्री. सुनिल शेरेकर यांनी केले. आंतरमंडळीय नाट्यस्पर्धेमध्ये एकूण चार उत्कृष्ट अशी नाटके सादर करण्यात आली. अउदा प्रकल्प मंडळ, अमरावतीतर्फे "जननी जन्मभूमीश्च" नाटक सादर करण्यात आले. अउदा संवसु मंडळ अमरावती व परिमंडळ कार्यालय अमरावती यांनी "महापात्रा", अउदा संवसु मंडळ, अकोला यांगी "जत्रा", संरक्षण स्वयंचलन संचारण मंडळ, अकोला आणि अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडळ, अमरावती यांनी "काकस्पर्श" ही नाटके सादर केली.

बक्षीस वितरण सोहळा, संगीत रजनी व समारोपाचा कार्यक्रम थाटात पार पडला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके होते. कार्यक्रमासाठी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. सतीश अणे तसेच मातोश्री विमलाताई देशमुख महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. स्मिताताई देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत महापारेषण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या दमदार अभिनयाने विविध भूमिका पार पाडत महापारेषणच्या नाट्यस्पर्धेत अउदा प्रकल्प मंडळ, अमरावती यांनी सादर केलेल्या "जननी जन्मभुमीश्च" या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावत कराड येथे होणा-या परिमंडळीय नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत जाण्यासाठी स्थान पटकावले आहे. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे दोन दिवस चाललेल्या महापारेषणाच्या नाट्यस्पर्धेत कलाकारांच्या निखळ अभिनयाने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. व्यावसायिक नाटकाच्या तोडीस तोड कसदार अभिनय त्याला दिग्दर्शन, नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना या सर्वांची उत्तम साथ यामुळे नाट्य स्पर्धेतील प्रत्येक नाटकाची चर्चा उपस्थित रसिक प्रेक्षकांमध्ये रंगली.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. किर्ती कुळकर्णी | मुख्य विधी सल्लागार | सांघिक कार्यालय, मुंबई | २८.११.२०२२ |

### निवृत्ती (सर्वश्री)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अरविंद दडमल | अधीक्षक अभियंता (पारेषण) | भार प्रेषण केंद्र, अंबाझरी | ३०.११.२०२२ |
| २. | जगन्नाथ चुडे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.११.२०२२ |

Health is Wealth

▶ अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी घेतला लाभ

# औरंगाबाद परिमंडळातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

Follow us on :

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, औरंगाबाद प्रशासकीय इमारत व परिसरात कार्यरत अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, औरंगाबाद व ए. एस. जी. आय. हॉस्पिटल, औरंगाबाद यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे उदघाटन औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. रंगनाथ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. संजय परदेशी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. बलराज पारिपेल्ली, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. प्रवीण यशवंते, कार्यकारी अभियंता अनुपमा जाधव उपस्थित होते.

दरम्यान, औरंगाबाद परिमंडळाच्या वतीने मोफत कोविड-१९ च्या लसीकरणाचे शिबिरही घेण्यात आले. याप्रसंगी कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. विवेक कानडे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. जितेंद्रसिंह पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) मंजूषा दुसाने उपस्थित होते.

या आरोग्य तपासणी शिबिराचा अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, औरंगाबाद प्रशासकीय इमारत व परिसरात कार्यरत अधिकारी व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी लाभ घेतला.




**औरंगाबाद :** येथील अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळाच्या वतीने अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, औरंगाबाद व ए. एस. जी. आय. हॉस्पिटल, औरंगाबाद यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

---

भ्रष्टाचारमुक्त भारत-विकसित भारत

▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचार निर्मुलनाची शपथ

# महापारेषणमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

Follow us on :

महापारेषणच्या सांघिक कार्यालयात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार निर्मुलनाची प्रतिज्ञा दिली.

शासनाच्या निर्देशानुसार शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थामार्फत दक्षता जनजागृती सप्ताह पाळण्यात येतो.


सुरूवातीला मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात आला. याप्रसंगी संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, श्री. संजीव भोळे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. इमाम सिद्दीकी, श्री. बलराज पारिपेल्ली, कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा शिंदे, श्री. विशाल वाघचौरे, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, सहाय्यक विधी अधिकारी कावेरी साप्ते यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.

From the Desk of Director, HR

# निरंतर सुधारणा का आवश्यक आहे?



ज्याला जीवनात आनंदही घ्यायचा आहे आणि यशही प्राप्त करावयाचे आहे, त्याने जीवनातील प्रत्येक दिवस नवा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. याचा अर्थच असा की माणूस मरतो एकदाच आणि जन्म घेतो दररोज. याची जाणीव ज्याला आहे, त्याला आपल्या जगण्यात आणि कामात निरंतर सुधारणा करण्याची का गरज आहे, हे वेगळे सांगण्याची गरजच पडत नाही. कारण, त्याला माहीत असते की रात्रभराच्या विश्रांतीनंतर आपण नवीन जन्म घेऊनच उठत असतो. त्या रात्रीने आपल्याला पुन्हा एक पूर्ण दिवस दिलेला असतो, हे तो जाणत असतो. त्यामुळेच त्याला त्या नवीन दिवसाचे मोल असते. त्या दिवसात आपण नवे काही केले पाहिजे, नवे काही शिकले पाहिजे, यासाठी तो प्रयत्न करतो. जीवनात जी संधी मिळते, तिचेही असेच आहे. ती आज ना उद्या प्रत्येकाच्या दारात येतच असते, पण काही जणांनी ती दारात उभी असताना, केवळ सबुरी नसल्याने गमावलेली असते. पण जे सबुरी ठेवतात, त्याला ती संधी मिळते, एवढे नक्की.

आपण शिक्षण घेतले किंवा पदवी मिळविली म्हणजे आपल्याला सर्व काही आले, आता त्याच भांडवलावर पूर्ण आयुष्य घालवू, असा चुकीचा समज अनेकजण करतात. पण आपल्याला सर्व काही येते आहे, हा गैरसमज असतो, हे खूप कमी माणसांना कळत असते. शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण कमी महत्वाचे आहे, असे कोणीच म्हणणार नाही. पण जेव्हा तुम्ही खुल्या जगात प्रवेश करता तेव्हा अनेक कौशल्ये नव्याने शिकून घेणे, ही गरजेची असतात. आपल्याला फॉरमल शिक्षणातून जे मिळाले आहे, त्याच्याशिवाय वेगळी कौशल्ये सेवा देताना लागतात, तेव्हा ती आत्मसात करताना अनेकांना मानसिक आणि शारीरिक त्रास होतो. वास्तविक ती आत्मसात करणे, खूप सोपे असते. अनेकदा तर केवळ नकारात्मक मानसिकता एवढाच काय तो अडथळा असतो. तो एकदा पार केला की ती आत्मसात करण्याचा मार्ग प्रशस्त होत असतो. पण अनेक जण अशावेळी आपल्या आयुष्यातील तणाव विनाकारण वाढवून घेतात. याचा दुसरा अर्थ असा की ज्या प्रकारची सेवा त्याच्याकडून हवी असते, ती त्या कंपनीला मिळत नाही. त्यातून त्याला मागे राहण्याची वेळ येते. याचा अर्थ आपल्यापुढे वाढवून ठेवलेली संधी असा माणूस स्वत:हूनच नाकारत असतो.

'Known is a Drop an Unknown is an Ocean' असे म्हटले जाते. पण हे अशाच माणसांना कळू शकते, ज्यांनी आपल्या मनातील जगाविषयीचे कुतूहल लहान मुलासारखे जागे ठेवले आहे. आपल्याला जग कळले आहे, असा समज जो करून घेतो, त्यासाठी त्याच्या आजूबाजूचा परिसर हेच त्याचे जग असते. आणि त्यातच राहण्यातून आपण आपले नुकसान करून घेत असतो. उदा. अलीकडे आपल्या देशात डिजिटल क्रांती होते आहे. पण आपण त्याविषयीचे शिक्षण घेतले नाही, म्हणून तो आपला विषय नाही, असा समज काही जण करून बसतात. त्यामुळे डिजिटल क्रांतीचे लाभ घेणारे जे सहकारी असतात, ते पुढे जातात आणि डिजिटलला दोष देणारे मागे राहतात. वास्तविक, डिजिटलायझेशन आता सर्व क्षेत्रांमध्ये एवढे पुढे गेले आहे की आपण डिजिटल क्रांतीत सहभागी होऊ शकत नाही, असे सांगण्यात काही भूषण राहिलेले नाही. याचा अर्थ आजूबाजूला घडणाऱ्या एवढ्या मोठ्या बदलाविषयी आपल्याला कुतूहल नसेल किंवा त्याचा स्विकार करण्यास एवढा त्रास होत असेल तर नव्या बदलाशी आपण जुळवून घेण्यास आपण तयार नाहीत. जीवनातील निरंतर सुधारणा अशी छोट्या मोठ्या बदलांतून होत असते, त्यासाठी अचानक काही बदल करण्याचीही गरज नसते. पण त्यावरही आपण मानसिकदृष्ट्या मात करू शकत नसू तर जग पुढे निघून जाणार, हे नक्की!

निरंतर बदलाचा दुसरा भाग आहे, एखाद्या विषयात नैपुण्य मिळविण्याचा. जसे की शाळा, महाविद्यालयात सर्व विषयांची आपल्याला ओळख करून दिली जाते. उद्देश्य असा की सर्व विषयातील थोडे थोडे आपल्याला कळले पाहिजे. पण जसजसे आपण उच्च शिक्षण घेतो, तसतसे आपल्याला एकाच विषयाचा अभ्यास करावा लागतो. कारण त्या विषयात आपण नैपुण्य मिळवावे, असे अपेक्षित असते. इतके की काही काळ त्याच्याशिवाय आपल्याला दुसरे काही सुचता कामा नये. आपल्यातील बहुतांश माणसे ही अशी विद्यावंत असतात, पण जेव्हा त्यातील काहीच त्याच्याही पुढे जातात, ती त्या विषयातील 'कलावंत' होतात. ती क्षमता फार कमी जणांकडे असते. आणि ती क्षमता ही बाहेरून जोर देवून येऊ शकत नाही. त्यासाठी स्वयंप्रेरितच असावे लागते. अशी 'कलावंत' माणसे जीवनाचा एक वेगळाच अनुभव घेत असतात. आपण तसा प्रयत्न करूच शकतो, पण ते सहज साध्य नाही, याची जाणीव असली पाहिजे. मग आपण नेमके काय करायचे, असा प्रश्न पडला पाहिजे. त्याचे उत्तर आहे, जेथे आणि जे काम मी करतो आहे, त्यात मी दररोज सुधारणा करतो आहे का, त्यातील कामातील सर्व नव्या गोष्टी, कौशल्ये खुल्या मनाने, आनंदाने शिकून घेतो आहे काय? असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला तर आपण नेमके काय करायला हवे आहे आणि आपण कोठे कमी पडतो आहोत, याचे आकलन ज्याचे त्याला होण्यास वेळ लागणार नाही.

माणसाचा हा जो प्रवास आहे, तोही समजून घेतला पाहिजे. विद्यावंत अनेक मिळतील पण कलावंत अगदीच कमी. विद्यावंत ते कलावंत हा प्रवास सोपा अजिबात नाही. त्यासाठी मेहनत, जिद्द व चिकाटी हवी. त्यामुळेच हा प्रवास अनेक जण मध्येच सोडून देतात. काही परिस्थितीमुळे व काही स्वइच्छेने. 'चाळीतले टॉवर्स' हे पुस्तक माझ्या हाती आले आणि त्या पुस्तकात अशा अनेक कलाकारांची माहिती मला मिळाली. त्यातून हा प्रवास किती रोमांचकारी आहे, हे मला लक्षात आले. त्या कलाकारांचा प्रवास किती खडतर आहे, याची जाणीव झाली. शिकण्यासाठी हा जन्म अपुरा आहे. कितीतरी ज्ञान आहे, आपण ते ज्ञान कसे घेतो, यावर सर्वकाही अवलंबून आहे. भौतिकदृष्ट्या माणसाने समाधानी राहिले पाहिजे. ज्ञानाच्या बाबतीत नाही. त्याची तहान ही वाढतच राहिली पाहिजे, असे मानणारे हे कलाकार मला त्या पुस्तकात भेटले. समाजाला भौतिक सेवा देणारे आपण सर्व माणसे, कदाचित, त्यांच्याप्रमाणे कलावंत होऊ शकणार नाही, मात्र त्यांच्या मेहनतीचा, त्यांच्या त्यागाची जाणीव तर ठेवू शकू. ते जसा प्रत्येक दिवस नवा मानतात, तसा आपण मानायला सुरुवात केली तर आपण आपल्या जीवनात जे काही करतो आहोत, त्याला न्याय तर देऊच शकू, असे मला वाटून गेले आणि ते आपल्याला आवर्जून शेअर करावे वाटले.

आणखी एक मुद्दा आपल्याला लक्षात आणून द्यायचा आहे, तो म्हणजे आपल्या आजूबाजूला अनेक माणसे वावरत असतात. वेगवेगळ्या विचारांची, वेगवेगळ्या स्वभावाची. रोज आपण त्यांना बघत असतो. पण प्रामाणिकपणे विचार केला तर खरच आपण बघत असतो का? त्यांच्याशी खरेच आपण संवाद साधत असतो का? की आपल्याला सर्वच गोष्टींचा वरवर अनुभवच पुरेसा ठरतो? तसे असेल तर आपण निरंतर बदलण्याचा आपला संकल्प विसरलो आहोत, असा याचा अर्थ आहे. कारण माणसे वाचणे आणि त्यानुसार आपल्या आयुष्याला आकार देण्याची संधी अशी प्रत्येक प्रसंगात, प्रत्येक संवादात आपल्यासमोर आलेली असते. ती आपण घेतली पाहिजे. आणखी एक गोष्ट. ज्या माणसाला आपण वाचतो आहोत किंवा त्याच्याशी संवाद साधतो आहोत, तो लौकिकार्थाने मोठाच असला पाहिजे, अशी काही गरज नाही. आपल्या आजूबाजूच्या सर्वसामान्य, साध्या माणसांकडूनही शिकण्यासारखे खूप काही असते. फक्त त्यांच्याकडे तसे पाहता आले पाहिजे.

थोडक्यात, आपल्याला बदलण्याची संधी प्रत्येक दिवस, प्रत्येक माणूस, प्रत्येक प्रसंग आणि प्रत्येक संवाद देत असतो. पण आपण त्याविषयी जागरूक आहोत का, याचा विचार ज्याचा त्याने करावयाचा आहे. तो करण्यासाठी जीवन समरसून जगले पाहिजे. तसे आपण करू शकलो तर आपण आपले कर्तव्य तर उत्तमपणे पार पाडूच, पण एक माणूस म्हणूनही आनंदी आणि यशस्वी जीवन आपण जगू शकू !

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**
**संचालक (मानव संसाधन)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)
MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.